RNI No. MAHBIL /2009/31748
Reg. No. MCS/174/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ९] बुधवार, फेब्रुवारी ३, २०१६/माघ १४, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३ फेब्रुवारी २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.**

क्रमांक एमयुपी. २०१६/प्र. क्र. २/नवि-१९.—ज्याअर्थी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम (१९५८ चा ६५) याच्या कलम २० ची पोट-कलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्र. केएमसी-२०११/६८३/प्र. क्र. १७१/नवि-१९, दिनांक १७ डिसेंबर २०११ (यापुढे " उक्त अधिसूचना " म्हणून संदर्भित केली आहे.) याद्वारे महाराष्ट्र शासनाकडून " बांधा, वापरा व हस्तांतरित करा " या तत्त्वावर कोल्हापूर शहर महानगरपालिका येथे एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प या योजनेंतर्गत मे. आय.आर.बी. कोल्हापूर इंटिग्रेटेड रोड डेव्हलपमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांनी कोल्हापूर शहरातील कोल्हापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत सुनिश्चित क्षेत्रातील (उक्त अधिसूचनेच्या अनूसूची - दोन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या) नव्याने बांधलेले, पुनर्बांधणी केलेले, सुधारणा किंवा यथास्थिती दुरुस्ती केलेले रस्ते, रेल्वे उड्डाणपूल याचा वापर करणाऱ्या उक्त अधिसूचनेतील अनुसूची १ मधील (२) व (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मोटार वाहनाच्या प्रवर्गावर तसेच अशा वाहनांनी ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानावर कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत बांधलेल्या अनुसूची २ मधील रस्त्यावर बांधलेल्या खालील पथकर वसुली नाक्यावर उक्त अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक वाहनासमोर विनिर्दिष्ट केले आहे, अशा कालावधीकरिता पथकर बसविण्यात आला आहे.

**पथकर नाक्याचा तपशील**

१. शिये नाका - शिये वडनगे राज्य महामार्ग क्र. १२८.

२. शिरोली नाका - राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते कोल्हापूर शहर.

३. उचगाव नाका - राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते उचगाव.

४. शाहू नाका - जुना राष्ट्रीय महामार्ग.

५. कळंबा नाका - कोल्हापूर - गारगोटी राज्य महामार्ग क्र. १३२.

६. वाशी नाका - कोल्हापूर - राधानगरी राज्य महामार्ग क्र. १३०.

७. फुलेवाडी नाका - कोल्हापूर-गगनबावडा राज्य महामार्ग क्र. ११५.

८. सरनौबतवाडी - राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते कोल्हापूर शहर.

९. आर. के. नगर - राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते के. आय. टी. कॉलेज, आर. के. नगर.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास सार्वजनिक हितार्थ उक्त पथकर नाका बंद करणे व परिणामतः उक्त अधिसूचना रद्द करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, मोटार वाहन कर अधिनियमांच्या कलम २० ची पोट-कलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम (१९०४ चा १) याचे कलम २१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्र. केएमसी-२०११/६८३/प्र. क्र. १७१/नवि-१९, दिनांक १७ डिसेंबर २०११ रद्द करीत आहे.

**स्पष्टीकरण.—**शंकांच्या निरसनासाठी असे घोषित करण्यात येते की, उक्त नमूद रस्त्यांवरुन जाणारी वाहने यांवर उक्त नमूद पथकर नाक्यांवर सदर अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून कोणताही पथकर आकारण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. र. परशुरामे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 3rd February 2016.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.

No. MUP-2016/C. R. 2/UD-19.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Urban Development Department, No. KMC. 2011/683/CR-171/UD-19, dated 17th December 2011, issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*),(*1-D*) and (*1-E*) of Section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), (hereinafter referred to as " the said notification ") declares that the levied toll shall be levied on the classes of the motor vehicles specified in column (2) and (3) of the Schedule-I appended to the said notification and on the trailers drawn by such motor vehicles passing through or over the Roads, Railway over Bridge, other Bridges newly constructed, reconstructed, improved or as the case may be, repaired, which form part of the Kolhapur City integrated Road Development Project (more particularly described in Schedule-II of the said notification)under the "Built, Operate and Transfer (BOT) Basis" by M/s I.R.B. Kolhapur Intigrated Road Development Company Private Ltd. (Special Purpose Vehicle), at the rates and for the periods specified against each of the said motor vehicles in the said Schedule-I at the toll collection centre listed below.

**Toll Naka Details**

1. Shiya Naka-On State Highway No. 128 between Shiya and Vadnage
2. Shiroli Naka – From the National Highway No. 4 to Kolhapur City.
3. Uchagaon Naka – The National Highway No. 4 to Uchagaon
4. Shahu Naka – On the old National Highway.
5. Kalamba Naka – On the Kolhapur-Gargoti State Highway No. 132
6. Washi Naka-Kolhapur-Radhanagari State Highway No. 130
7. Phulewadi Naka – On the Kolhapur-Ganganbawada State Highway No. 115.
8. Sarnobathwadi – From the National Highway No. 4 to Kolhapur City.
9. R. K. Nagar – On the National Highway No. 4 to K.I.T. College, R. K. Nagar.

And whereas, the Government of Maharashtra in the public interest considers it expedient to close the said toll collection centres; and consequentially to rescind the said notification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*),(*1-B*), (*1-C*),(*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904), the Government of Maharashtra hereby rescinds the said Government Notification, Urban Development Department, No. KMC. 2011/683/CR-171/UD-19, dated 17th December 2011.

*Explanation.*—For the removal of doubt it is hereby declared that, no toll shall be levied on the vehicles passing over the said road and no toll shall be collected at the said toll collection centres from the date of publication of this notification in the *Official Gazette.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. R. PARSHURAME,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.